स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

ई-मेल. vishi1-hted@mah.gov.in, popat.galgate@gov.in दूरध्वनी क्र.०२२ २२७९३१७४

क्रमांक:- संकीर्ण-२२०४/प्र.क्र.९१/विशि-१ दिनांक:- १६.११.२०२२

प्रति,

संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

<u>विषय</u>:- दि.१४.०६.२००६ पूर्वी नियुक्त एम.फील. अर्हता धारक अध्यापकांना कॅसचे लाभ लागू करणेबाबत.

<u>संदर्भ</u>:- विद्यापीठ अनुदान आयोगाचे पत्र क्र.F-९-१२/२०२०/(PS/MISC.), दि.०५.०९.२०२२.

विषयांकित प्रकरणी संदर्भाधीन पत्रान्वये विद्यापीठ अनुदान आयोगाने एम. फील. अर्हताधारक अध्यापकांना कॅस अंतर्गत पदोन्नतीच्या लाभासंदर्भात निर्गमित केलेल्या स्पष्टीकरणात्मक खुलाशाच्या अनुषंगाने आपणांस खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१) विद्यापीठ अनुदान आयोगाने दि.१९.०९.१९९१ च्या अधिसूचनेन्वये अकृषि विद्यापीठे व वरिष्ठ महाविद्यालयात अध्यापक म्हणून नियुक्त होण्यासाठी नेट परीक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य केलेले आहे. सदर तरतुदी शासन निर्णय दि.२३.१०.१९९२ अन्वये राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयांना लागू केली. तथापि, तद्नंतर राज्यात बऱ्याच बिगर नेट अर्हता धारक उमेदवारांच्या नियुक्त्या अध्यापक पदावर करण्यात आलेल्या आहेत. सदर बिगर अर्हताधारक अध्यापकांना विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेली अर्हता धारण करण्यासाठी वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली. त्यानुसार ज्या बिगर अर्हता धाकर अध्यापकांनी विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेली अर्हता धारण केली, त्या दिनांकापासून सदर अध्यापकांच्या सेवा नियमित करून कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ देय करण्यात आले आहेत. तसेच ज्यांनी सदर अर्हता धारण केली नाही. अशा बिगर अर्हताधाक अध्यापकांच्या सेवा शासन निर्णय दि.२७.०६.२०१३ अन्वये शासन निर्णयाच्या दिनांकापासून काही अटीशर्तीच्या अधीन राहून सर्व प्रयोजनार्थ ग्राह्य धरण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयाविरुध्द मा. उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठापुढे दाखल याचिकांमध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी एकत्रितपणे याचिका क्र.२०८२/२०१३ मध्ये दि.२३.१२.२०१५ रोजीच्या आदेशानुसार दि.२७.०६.२०१३ रोजीचा शासन निर्णय वैध ठरविलेला आहे. मा. उच्च न्यायालयाच्या सदर आदेशाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल झालेल्या असून सद्य:स्थिती प्रकरण सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

२) दरम्यान विद्यापीठ अनुदान आयोगाने दि.१४.०६.२००६ अधिसूचनेन्वये सन २००० च्या अधिसूचनेतील खालील मुद्यांमध्ये सुधारणा केलेली आहे.

"NET shall remain the compulsory requirement for appointment as Lecturer even for candidate having Ph.D. degree. However, the candidates who have completed M. Phil. degree or have submitted Ph.D. thesis in the concerned subject upto 31st December, 1993 are exempted from appearing in the NET examination.

Should be substituted with the following para :

Institutions affiliated to it Regulation, 2000, where the following para occurs :-

"NET shall remain the compulsory requirement for appointment as Lecturer for those with post-graduate degree. However, the candidates having Ph.D. degree in the concerned subject are exempted from NET for PG level and UG level teaching. The candidates having M.Phi. degree in the concerned subject are exempted from NET for UG level teaching only.

विद्यापीठ अनुदान आयोगाने दि.२४.०२.२००९ च्या पत्रानुसार दि.१४.०६.२००६ च्या अधिसूचनेन्वये विहित केलेली शैक्षणिक अर्हता दि.१४.०६.२००६ रोजी वा त्यानंतर अध्यापक म्हणून नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना लागू राहील, असे कळविण्यात आले आहे. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सदरहू दि.१४.०६.२००६ च्या अधिसूचनेच्या अनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोगाने दि.१६.११.२००६ रोजीच्या पत्रान्वये पीएच.डी./एम. फील. अर्हताधारक अध्यापकांना नेट परीक्षेतून सुट देण्याबाबत माहिती सादर करण्यात कळविले होते. त्यानुषंगाने शासन पत्र दि.०५.१२.२००६ नुसार ज्यांची नियुक्ती दि.१४.०६.२००६ पूर्वी नियुक्ती झाली व ज्यांनी दि.१४.०६.२००६ पूर्वी पीएच.डी./एम. फील. अर्हता प्राप्त केलेली आहे किंवा यापैकी कोणतीच अर्हता धारण केलेली नाही, त्यांच्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने सूचित केल्यानुसार अशा अध्यापकांना नेट मधून सूट देण्याबाबतचे प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मान्यतेसाठी सादर करण्याबाबत सर्व अकृषि विद्यापीठांना कळविण्यात आले. त्यानुषंगाने राज्यातील ज्या अकृषि विद्यापीठांना पीए.डी./एम.फील. अर्हताधारक अध्यापकांना नेट मधून सूट मिळण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगास प्रस्ताव सादर केले व त्यानुषंगाने विद्यापीठांकडून प्राप्त प्रस्तावानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाने पीएच.डी./एम.फील. अर्हताधारक अध्यापकांना नेट परीक्षेमधून सूट देऊन सदर अध्यापकांच्या नावाची यादी संबंधित विद्यापीठांना पाठविलेली आहे.

३) विद्यापीठ अनुदान आयोगाने दि.०५.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये दि.१४.०६.२००६ पूर्वी एम. फील. अर्हतेवर विहित निवड समितीच्या माध्यमातून नियुक्ती तसेच सेवेत सदर अर्हता धारक, ज्यांना विद्यापीठाने नियमित मान्यता दिलेली आहे व ज्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट मधून सुट दिलेली आहे, असे अध्यापक एम. फील. अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीसाठी पात्र आहेत, असे कळविलेले आहे. त्यानुसार असे स्पष्ट करण्यात येते की, दि.१४.०६.२००६ पूर्वी ज्या अध्यापकांची नियुक्ती एम. फील. अर्हतेवर विहित निवड समितीच्या माध्यमातून झाली आहे व ज्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट परीक्षेमधून मधून सुट देऊन तसे अध्यापकांच्या नावासहित विद्यापीठांना कळविलेले आहे व त्यानुसार विद्यापीठाने नियमित स्वरूपात मान्यता दिलेली आहे, अशा एम. फील. अर्हताधारक अध्यापकांना सदर अर्हता धारण केल्याच्या दिनांकापासून कॅस अंतर्गत पदोन्नतीचे लाभ देय राहतील.

४) तसेच ज्या एम. फील. अर्हताधारक अध्यापकांना विद्यापीठ अनुदान आयोगाने नेट परीक्षेमधून सुट दिलेली नाही तसेच विद्यापीठाने देखील नियमित स्वरूपात मान्यता दिलेली नाही. अशा अपात्र अध्यापकांनाही कॅसचे लाभ देण्यात आले असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली असल्याने त्याबाबत कार्यवाही करण्याबाबत शासन पत्र दि.२१.०१.२०२२ अन्वये कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह तात्काळ शासनास सादर करावा.

(अजित बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:- उचित कार्यवाहीसाठी,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.

२. निवडनस्ती (विशि-१)